**आकाशवाणी नागपूर,**

**(मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक २२ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

- **आरोग्य, शिक्षण,स्वच्छता, पर्यावरण आणि रोजगार या पंचसूत्रीवर आधारित अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निवडणूक जाहीरनामा आज घोषित.**
- **लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात येत्या २६ तारखेला मतदान-सर्व मतदार संघांमध्ये प्रचार शिगेला.**
- **'मोदी सरकार नव्हे आम्हाला भारत सरकार हवं आहे', अमरावतीच्या प्रचार सभेत महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भाजपवर टीका.**
- **लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यापूर्वी उष्णतेच्या लाटेवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाकडून टास्क फोर्सची स्थापना.**
- **आज विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस- नागपूर, अमरावती, वर्धा आणि यवतमाळात गारपिटीची शक्यता.**

*****

**राष्ट्रवादी काँग्रेस-जाहीरनामा**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आज आपला निवडणूक जाहीरनामा घोषित केला आहे. अठरापगड जाती आणि बारा बलुतेदार यांचा विचार करणारा आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा आणि देशाच्या तसंच राज्याच्या विकासप्रक्रियेला पुढे नेणारा हा जाहिरनामा आहे, अशा शब्दांत अजित पवार यांनी या जाहीरनाम्याचं कौतुक केलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही जाहिरनामा समिती स्थापन करण्यात आली होती. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण आणि रोजगार या ग्रामविकासाच्या पंचसूत्रीवर राष्ट्रवादी काम करणार असून 'राष्ट्रासाठी

राष्ट्रवादी' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रवादीचा जाहिरनामा असल्याचं अजित पवारांनी स्पष्ट केलं. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा,दिवंगत यशवंतराव चव्हाण यांना भारतरत्न देण्यात याव, शेतकऱ्यांना एमएसपी मिळावी, अपारंपरिक वीज निर्मितीला चालना, उद्योगांना प्राधान्य, कृषी पिक विम्याच्या व्याप्तीत वाढ,जातीनिहाय जनगणना, ऊर्दू शाळांना सेमी इंग्रजीचा दर्जा, ही ठळक वैशिष्ट्ये अजित पवार यांनी या जाहीरनाम्याची सांगितली.

**माजी आमदार मुश्ताक अंतुले**

कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार मुश्ताक अंतुले यांनी आज मुंबईत एमसीए लॉन्ज इथं राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. महाराष्ट्रात विकास करण्यासाठी शक्ती उभी राहिली आहे,म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती अंतुले यांनी दिली. अंतुले यांच्यासोबत ॲड.विलास नाईक यांनीही जाहीर प्रवेश केला आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे उपस्थित होते.

**दूसरा टप्पा-प्रचार सभा**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यात नांदेड, हिंगोली, परभणी, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ -वाशिम या आठ मतदार संघात, येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर या सर्व मतदार संघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे. अमरावतीमध्ये आज महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक यांची सभा संपन्न झाली. 'मोदी सरकार

नव्हे आम्हाला भारत सरकार हवं आहे,' असं म्हणत आज महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अमरावतीच्या प्रचार सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर कठोर टीका केली. महाविकास आघाडीचे अमरावती मतदार संघासाठीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्यासाठी आयोजित प्रचार सभेला पवार संबोधित करीत होते. १० वर्षे सत्तेत असताना काय केलं हे सांगण्यापेक्षा मोदी सतत कॉंग्रेस आणि नेहरूंवर टीका करीत असतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर बोलत नाहीत. भाजपच्या एका नेत्यानं संविधान बदलण्याची भाषा केली. आम्ही ते बदलू देणार नाही, कारण पंडित नेहरूंनी संसदीय लोकशाही देवून आपल्यावर उपकार केले आहेत, असं पवार म्हणाले. नवनीत राणा या अमरावती मतदार संघातून महायुतीच्या उमेदवार आहेत. त्यांना २०१९ मध्ये पाठींबा दिल्याचा खेद असल्याचं पवार यांनी यावेळी नमूद केलं. 'विद्यमान सरकारवर महाराष्ट्राचे उद्योग गुजरातला हलविण्याचा आरोप यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला. आणि आम्ही ते कुठल्याही परिस्थितीत जाऊ देणार नाही अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. आज सायंकाळी नांदेड जिल्ह्यात भोकर इथं उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांची महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ सभा होणार आहे. तर उद्या गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा अकोला दौऱ्यावर असून भाजप महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारार्थ शहा यांच्या जाहीर सभेचं आयोजन अकोला क्रिकेट क्लब मैदानावर करण्यात आलं आहे.

**तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज मागे**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस आहे. या टप्प्यात मराठवाड्यातल्या लातूर आणि उस्मानाबादसह राज्यातल्या अकरा मतदारसंघात ३६१ उमेदवारांचे ५२२

अर्ज दाखल झाले होते, यापैकी ३१७ उमेदवारांचे अर्ज छाननी अंती वैध ठरले आहेत. तिसऱ्या टप्प्यातलं मतदान सात मे रोजी होणार आहे.

**चौथा टप्पा अर्ज दाखल**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते यावेळी उपस्थित होते. नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून भाजप उमेदवार डॉ. हिना गावित तसंच कॉँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी देखील आज उमेदवारी अर्ज भरला. मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते.

**राजकीय प्रचार**

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला सुरुवात झाली आहे. आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या दुपारी राजकीय पक्षाचं प्रसारण संपल्यानंतर प्रसारीत केलं जाईल.

**लोकनिर्णय महाराष्ट्राचा**

राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण बारामती लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी

सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**तापमान टास्क फोर्स**

लोकसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यापूर्वी उष्णतेच्या लाटेवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगानं टास्क फोर्सची स्थापना केली आहे. टास्क फोर्समध्ये निवडणूक आयोग, भारतीय हवामान खातं, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि आरोग्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्रत्येक मतदान टप्प्याच्या पाच दिवस आधी हा टास्क फोर्स उष्णतेची लाट आणि आर्द्रतेच्या प्रभावाचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करतील. तापमान वाढीच्या अनुषंगानं शामियाना, पिण्याचे पाणी, पंखे आणि इतर सुविधांसह मतदान केंद्रांवर पुरेशी व्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी आयोग, राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसह स्वतंत्र आढावा देखील घेईल. दरम्यान, या महिन्याच्या 26 तारखेला होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी, उष्णतेच्या लाटेबाबत कोणतीही मोठी चिंता नसून या टप्प्यातील मतदानासाठी 13 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी हवामानाचा अंदाज सामान्य असल्याचं भारतीय हवामान खात्याच्या महासंचालकांनी निवडणूक आयोगाला कळविलं आहे

**टोकन मतदान-उष्मा प्रतिबंध**

बुलढाणा जिल्ह्यात सद्य:स्थितीतल्या उष्ण तापमानाच्या पार्श्वभूमीवर मतदानासाठी येणाऱ्या मतदारांच्या सुलभतेसाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहे. यावेळी मतदान केंद्रावर येणाऱ्या प्रत्येकाला टोकन देण्यात येणार आहे. मतदानासाठी एकावेळी फक्त पाच मतदार रांगेत उभे राहतील, उर्वरीत टोकन असणाऱ्या मतदारांसाठी मतदान केंद्राच्या बाजूच्या खोलीत बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे.

**ऑलिम्पिक निवड**

मेरेथॉन चालण्याची स्पर्धा मिश्र रिले स्पर्धेत भारताच्या प्रियंका गोस्वामी आणि अक्षदीप सिंह यांनी आगामी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत पात्रता मिळवली आहे. काल तुर्की मध्ये झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत १८ व्या स्थानावर राहील्यानं त्यांची ऑलिम्पिक स्पर्धेसाठी निवड झाली. नेमबाजीतही भारताच्या मनु भाकर आणि अनीश भानवाला यांनी दिल्लीमध्ये झालेल्या ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत पहिल्या स्थानावर राहून ऑलिम्पिक मधली पात्रता जवळपास निश्चित केली आहे.

**हवामान**

आज नागपुरात दिवसभर ढगाळ वातावरण होते आणि काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या. विदर्भात मागील २४ तासात कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअस इतक्या तापमानची घट झाली असून येत्या तीन दिवसात विदर्भात सर्वत्र हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागातर्फे वर्तविण्यात आली आहे. आज विदर्भातील नागपूरसह अमरावती,यवतमाळ आणि वर्धा इथ गारपीटीची शक्यता असून इतर जिल्ह्यात वीजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसात विदर्भातील सर्व जिल्ह्यात सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह तुरळक पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

****